साप्ताहिक

डोंबिवली + कल्याण + ठाणे + रायगड + नागपुर

# महाविद्यालय खबरबात

RNI NO - MHMAR/26/A2042

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ.राजकुमार मा.कोल्हे

संपादक - डॉ.सौ. प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

▪ वर्ष १ ▪ अंक १ ▪ गुरुवार ९ एप्रिल ते १५ एप्रिल २०२६ ▪ किंमत ३ रुपया ▪ पाने ४

**राष्ट्रीय शिक्षण संस्था,रेझिंग ए मॅथेमॅटिशियन फाउंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने**

## शालेय विद्यार्थ्यांसाठी गणित विषयासंबंधित मॅथ्स सर्कल हा उपक्रम संपन्न



डोंबिवली ( प्रतिनिधी ) - राष्ट्रीय शिक्षण संस्था,रेझिंग ए मॅथेमॅटिशियन फाउंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी गणित विषयासंबंधित मॅथ्स सर्कल या उपक्रमाचा समारोप शनिवार दिनांक ४ एप्रिल रोजी संस्थेच्या डॉ.हेडगेवार सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी चे अध्यक्ष श्री. प्रसाद खोत हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थाध्यक्ष डॉ श्री.संजय कुलकर्णी व मॅथ्स सर्कल उपक्रम समन्वयक व संस्था उपाध्यक्षा डॉ. सौ.सरोज कुलकर्णी, रेझिंग ए मॅथेमॅटिशियन फाउंडेशन च्या सौ. वृषाली नायर, रोटरीचे प्रकल्प समन्वयक श्री. संतोष नंबुदिरी यांसह रोटरी व रॅम चे सदस्य , संस्था पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थाध्यक्ष डॉ.श्री.संजय कुलकर्णी यांनी केले. यामध्ये मॅथ्स सर्कल या उपक्रमाची संकल्पना रेझिंग अ मॅथेमॅटिशन चे श्री. विनय नायर यांच्या संपकार्मुळे महाराष्ट्रात प्रथमच आपल्या राष्ट्रीय शिक्षण संस्थेने सुरू केली. गेली तीन वर्ष हा उपक्रम सुरू आहे.या उपक्रमाचे सर्व व्यवस्थापन संस्था उपाध्यक्षा डॉ. सौ. सरोज कुलकर्णी बघतात .यातून पुढे येणारे विद्यार्थी हे नक्कीच स्वतःच्या क्षेत्रामध्ये नाव कमवतील. रोटरी क्लबच्या मदतीमुळे डोंबिवलीमध्ये ही संधी आमच्या संस्थेला उपलब्ध करून देता आली, म्हणून रोटरी क्लबच्या सर्व सदस्यांचे आभार मानले. या विद्यार्थ्यांना मॅथ्स सर्कल हा उपक्रम फायदेशीर ठरेल .गणितातील एखादी समस्या चार ते पाच मागार्ने सोडवता येते असे म्हटले.तर विद्यार्थ्यांना या उपक्रमासाठी आणणे व तेवढा वेळ थांबणे यासाठी पालकांनी देखील वेळ दिला याबद्दल त्यांचे कौतुक केले . यावेळी मॅथ्स सर्कल समन्वयक व संस्था उपाध्यक्षा डॉ. सौ. सरोज कुलकर्णी यांनी मॅथ्स सर्कल उपक्रमामधील सर्व शिक्षक तसेच रोटरी क्लब मधील सर्व सदस्यांचा परिचय करून दिला. तसेच सर्वांचे स्वागत पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री .प्रसाद खोत म्हणाले की गणित हे आपल्या डीएनए मध्ये असून हे सुप्त गुण जागृत करण्याचे काम रेझिंग अ मॅथेमॅटिशन व राष्ट्रीय शिक्षण संस्था करीत आहे. गणितातील काम पुढे नेणारे ठरत असून याला आम्ही हातभार लावत आहोत. यातून विद्यार्थ्यांनी गणिताची आवड जोपासावी असे म्हटले. यावेळी सौ. वृषाली नायर यांनी देशात वेगवेगळ्या संस्था मॅथ्सचे रेसिडेन्शियल कॅम्प आयोजित करत असतात अशा कॅम्पला आपल्या डोंबिवली मधून आपल्यातील विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळवावा असे म्हटले. यावेळी मॅथ्स सर्कलचे शिक्षक श्री.केदार पेणकर , श्री.सुंदरम शर्मा आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांमधून कु. समृद्धी झगडे व श्री.स्पंदन मयेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यातआले.प्रमाणपत्र वितरणाच्या यादीचे वाचन श्रीमती पल्लवी गवळी यांनी केले . संस्थेच्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर रामचंद्रनगर इंग्रजी माध्यम शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.वैभवी संतोष सावंत यांनी गेले वर्षभर या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुणोदय प्राथमिक शाळेतील शिक्षिका सौ मानसी पवार यांनी केले. यावेळी रोटरी क्लबचे जिल्हा सचिव विनेश नायर, मुकेश सोनवणे आदींसह संस्थेचे कार्यवाह श्री. शिरीँष फडके, कोषाध्यक्ष श्री.संजय दीक्षित,संस्था कार्यकारणी सदस्य श्री .प्रकाश म्हात्रे, श्री.अरुण ऐतवडे यांसह सर्व शाळांचे मुख्याध्यापक , समितीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## आनंदाची बातमी! LPG गॅसची चिंता मिटली, केंद्राचा सर्वात मोठा निर्णय; लाखो भारतीयांना फायदा होणार




मुंबई ( प्रतिनिधी ) - इंधन पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. प्रवासी कामगारांसाठी बाजारभावानेमिळणाऱ्या ५ किलो एलपीजी सिलेंडरचा दैनंदिन कोटा दुप्पट करण्यात आला आहे.

इराण आणि अमेरिका यांच्यात सुरु असलेल्या युद्धामुळे आखाती देशांमध्ये तणावाचे वातावरण आहे. होर्मुज सामुद्रधुनीतून होणारी जहाज वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे भारतात येणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यावरही परिणाम झाला आहे. अशातच आता इंधन पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. प्रवासी कामगारांसाठी बाजारभावाने मिळणाऱ्या ५ किलो एलपीजी सिलेंडरचा दैनंदिन कोटा दुप्पट करण्यात आला आहे. त्यामुळे देशभरातील लाखो ग्राहकांना याचा फायदा होणार आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

५ किलोच्या सिलेंडरचा कोटा वाढवला

घरगुती वापरासाठी असलेल्या अनुदानित १४.२ किलो सिलेंडरच्या तुलनेत, ५ किलोच्या सिलेंडरची किंमत बाजारभावानुसार वेगळ्या प्रकारे ठरवली जाते, जी थोडी महाग असते. दिल्लीमध्ये ५ किलोच्या सिलेंडरची किंमत ५४९ रुपये आहे, तर १४. २ किलो घरगुती सिलेंडरची किंमत ९१३ रुपये आहे. ५ किलोचे सिलेंडर एलपीजी वितरकांकडून थेट विक्रीसाठी उपलब्ध असतात. यासाठी फक्त ओळखपत्र दाखवावे लागते (पत्त्याचा पुरावा आवश्यक नाही). नियमित घरगुती गॅस कनेक्शनसाठी मात्र पूर्ण KYC प्रक्रिया आवश्यक असते.

## शैक्षणिक क्षेत्रातील मोठी बातमी! राज्यातील ३८ महिला पदवी महाविद्यालयांना मंजुरी.....



मुंबई (प्रतिनिधी) - राज्यात प्राध्यापकपदाच्या भरतीची प्रक्रिया सुरू असतानाच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महिला शिक्षणाला चालना देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २०२६-२७ या शैक्षणिक वषार्साठी २७ महिला पदवी महाविद्यालयांना मंजुरी दिली आहे. ही सर्व महाविद्यालये मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठाशी संलग्न असणार आहेत. राज्यात एकूण ३८ नव्या महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागात ही महाविद्यालये सुरू होणार असल्याने विद्यार्थिनींना घराजवळच उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली' (एनसीपीएस) द्वारे विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. निकषांची पूर्तता करणाऱ्या ३८ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. मान्यता मिळालेल्या महाविद्यालयांमधील २७ महाविद्यालये एसएनडीटी विद्यापीठाशी संलग्न असणार आहेत. तर नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्न ८ महाविद्यालयांनाही मान्यता मिळाली आहे. यासह जळगाव, अमरावती आणि छ. संभाजीनगर येथील प्रत्येकी एका महाविद्यालयालाही मंजुरी देण्यात आली आहे. ही सर्व महाविद्यालये कायम विनाअनुदानित तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहेत. या संबंधित संस्थांना 'इरादापत्र' देण्यात आलेत. दरम्यान या नव्या महाविद्यालयांमध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांचे विविध अभ्यासक्रम शिकवले जातील. यात बीएस्सी (विज्ञान व तंत्रज्ञान), बीएस्सी (होम सायन्स), बीए (मानव विज्ञान) आणि बीकॉम (व्यवस्थापन) या अभ्यासक्रमांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

## 'सायबर सुरक्षा व नवीन तंत्रज्ञान' यावर संजय जाधव यांच्या व्याख्यानाचे आयोजन




डोंबिवली ( प्रतिनिधी) - रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट येथे गुरुवार दिनांक ८ एप्रिल रोजी अतिरिक्त पोलीस आयुक्त (पूर्व विभाग,ठाणे) श्री.संजय जाधव यांचे 'सायबर सुरक्षा आणि नवीन तंत्रज्ञान' विषयावर मार्गदर्शक व्याख्यान हे रोटरी भवन, डोंबिवली पूर्व इथे झाले. संपूर्ण सभागृह श्रोत्यांनी भरलेले होते.त्यांनी अपरिचित कॉल्स व लिंक टाळा, वैयक्तिक माहिती शेअर करू नका, दुहेरी लॉक वापरा आणि 'डिजिटल अरेस्ट' सारख्या फसवणुकीपासून सतर्क राहा,असे सांगितले. सायबर गुन्हेगार भीती व अज्ञानाचा फायदा घेतात, याची जाणीव करून देत 1930 हेल्पलाईनचा उपयोग करण्याचे आवाहन केले. विविध सायबर गुन्हे कसे होतात, त्यामागे काय मानसिकता असते ह्याची सविस्तर माहिती दिली.क्लब चे अध्यक्ष डॉ.संदीप घरत व मानद सचिव विनायक आगटे उपस्थित होते. कार्यक्रमातून खूपच उपयुक्त माहिती मिळाली.सूत्रसंचालन रोटेरिअन आरती बापट ह्यांनी केले. श्री. संजय जाधव ह्यांचा परिचय रोटेरिअन मानस पिंगळे ह्यांनी करून दिला. आभार प्रदर्शन हे रोटेरिअन अथर्व जोशी यांनी केले.

# संपादकीय

## उच्च शिक्षण : बदलत्या काळातील दिशा, आव्हाने आणि संधी

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. ज्ञानाधिष्ठित समाजाकडे वाटचाल करताना शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता कौशल्य, मूल्ये आणि नवोपक्रम यांचा संगम बनणे आवश्यक आहे.भारतामध्ये नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020) लागू झाल्यानंतर उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडत आहेत. विद्यार्थ्यांना बहुविध अभ्यासक्रम, लवचिकता आणि कौशल्याधारित शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. ही परिवर्तनाची दिशा स्वागतार्ह असली तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी हीच खरी कसोटी आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज....

आज अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठे वाढत असली तरी गुणवत्तेचा प्रश्न कायम आहे. केवळ प्रमाण वाढविण्याऐवजी शिक्षणाची गुणवत्ता, संशोधनाची पातळी आणि शिक्षकांचे प्रशिक्षण यावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीसाठी नव्हे, तर समाजनिर्मितीसाठी सक्षम नागरिक म्हणून घडणे, ही उच्च शिक्षणाची खरी जबाबदारी आहे.

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

तंत्रज्ञानाचा प्रभाव....

डिजिटल क्रांतीमुळे शिक्षणाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. ऑनलाइन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), आभासी प्रयोगशाळा यामुळे विद्यार्थ्यांना नव्या संधी उपलब्ध होत आहेत. मात्र, डिजिटल दरी ही एक मोठी समस्या आहे. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांमधील अंतर कमी करणे गरजेचे आहे.

स्वायत्तता आणि उत्तरदायित्व....

महाविद्यालयांना स्वायत्तता देताना त्याचबरोबर उत्तरदायित्वही आवश्यक आहे. अभ्यासक्रम रचना, परीक्षा पद्धती आणि मूल्यांकन यामध्ये पारदर्शकता व गुणवत्ता राखली गेली पाहिजे.शिक्षण संस्था या केवळ पदवी देणाऱ्या केंद्रांपेक्षा नवकल्पनांचे केंद्र बनल्या पाहिजेत.

संशोधन व उद्योजकतेला चालना....

उच्च शिक्षणामध्ये संशोधनाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना स्टार्टअप्स, नवकल्पना आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन दिल्यास देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल.नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकरी निर्माण करणारे विद्यार्थी तयार करणे ही काळाची गरज आहे.

मूल्याधारित शिक्षणाचे महत्त्व

आजच्या स्पर्धात्मक युगात नैतिकता, सामाजिक जबाबदारी आणि मानवता या मूल्यांचा विसर पडू नये. उच्च शिक्षण हे केवळ बुद्धिमत्तेचा विकास न करता व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवणारे असावे.

उच्च शिक्षण हे राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. सरकार, शिक्षण संस्था, शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास भारत ज्ञानमहाशक्ती बनू शकतो.आज गरज आहे ती बदल स्वीकारण्याची, गुणवत्ता वाढवण्याची आणि शिक्षणाला समाजहिताशी जोडण्याची.

# JMF कॅम्पसमध्ये संस्कृतीचा भव्य उत्सव : G-20, महाकुंभ मेळा, श्रीराम मंदिर आणि ध्वजारोहणाच्या प्रतिकृतींचा अद्वितीय सोहळा

मागील दोन वर्षांत अभूतपूर्व आणि प्रेरणादायी असे अनेक उपक्रम पार पडले. देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्यांची जपणूक करण्याच्या उद्देशाने G-20 परिषद, महाकुंभ मेळा, श्रीराम मंदिर अयोध्या आणि ध्वजारोहण या महत्त्वपूर्ण घटकांच्या भव्य प्रतिकृती साकारण्यात आल्या.



या उपक्रमात हजारो विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाला यशस्वी केले.

या अनोख्या उपक्रमाचे यजमान होते वंदे मातरम् डिग्री कॉलेज आणि जना गण मन स्कूल. दोन्ही संस्थांनी एकत्रितपणे नियोजन, सादरीकरण आणि व्यवस्थापन करत हा कार्यक्रम अत्यंत भव्य आणि प्रभावी केला.

**G-20 परिषदेची प्रतिकृती : जागतिक दृष्टीकोनाचा अनुभव**

विद्यार्थ्यांनी साकारलेली G-20 परिषदेची प्रतिकृती ही केवळ दृश्यात्मक नव्हती, तर त्यातून जागतिक राजकारण, अर्थव्यवस्था आणि सहकार्य यांचे सखोल ज्ञानही विद्यार्थ्यांना मिळाले. विविध देशांचे प्रतिनिधित्व करत विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित झाले.

महाकुंभ मेळ्याची अनुभूती : अध्यात्म आणि परंपरेचा संगम

महाकुंभ मेळ्याच्या प्रतिकृतीद्वारे भारतीय अध्यात्म, श्रद्धा आणि परंपरा यांचे जिवंत दर्शन घडवण्यात आले. विविध धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पारंपरिक वेशभूषा यामुळे उपस्थितांना प्रत्यक्ष कुंभमेळ्याचा अनुभव मिळाला. 5000 च्या वर विद्यार्थी व पालक यामधे भक्ति भावाने सहभागी झाले होते. यामधे गंगा व

विशेष प्रतिनिधी
महाविद्यालय खबरबात
(साप्ताहिक)

यमुना वाहत्या नद्या व दोन घाट बनवून त्या मध्ये हजारो भक्तानी स्नान करून आपल्याला तृप्त केले.

**श्रीराम मंदिर अयोध्या : श्रद्धा आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक**

श्रीराम मंदिर अयोध्याची प्रतिकृती ही कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरली. विद्यार्थ्यांनी अत्यंत बारकाईने आणि भक्तिभावाने मंदिराची रचना साकारली होती. यामुळे भारतीय संस्कृतीतील आदर्श, मूल्ये आणि श्रद्धा यांची जाणीव नव्या पिढीला झाली.

**ध्वजारोहण सोहळा : देशभक्तीची प्रेरणा**

ध्वजारोहणाच्या प्रतिकृतीद्वारे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, एकता आणि राष्ट्रप्रेम यांचा संदेश दिला गेला. राष्ट्रध्वजासमोर सादर करण्यात आलेले कार्यक्रम आणि घोषणांनी वातावरण देशभक्तीने भारावून गेले.

दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व : डॉ. राजकुमार कोल्हे

या सर्व उपक्रमांचे नेतृत्व डॉ. राजकुमार कोल्हे, संस्थापक अध्यक्ष, यांनी केले. त्यांच्या दूरदृष्टी, प्रेरणा आणि मार्गदर्शनामुळे हे उपक्रम केवळ एक कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.त्यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नैतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्यांची रुजवणूक करण्यात आली. शिक्षणाबरोबरच संस्कार देण्याचे कार्यही या उपक्रमातून प्रभावीपणे पार पडले.

**समारोप**

JMF कॅम्पसमधील हे सर्व उपक्रम केवळ एक प्रदर्शन नव्हेत, तर तो एक शिक्षणाचा जिवंत अनुभव होता. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागातून शिकण्याची संधी मिळाली, तर पालकांनाही आपल्या मुलांच्या प्रतिभेचा अभिमान वाटला.अशा उपक्रमांमुळे शिक्षण संस्था या केवळ ज्ञान देणाऱ्या नव्हे, तर संस्कार घडवणाऱ्या केंद्र म्हणून उभ्या राहत आहेत. खटऋ चा हा प्रयत्न निश्चितच इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल.

# राज्यातील ५००० च्यावर प्राध्यापकांच्या पदभरतीला मान्यता; महिनाभरात निघणार जाहीरात



नागपूर : गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त असल्याने शैक्षणिक कामांवर परिणाम होत आहे. या समस्येतून मार्ग काढण्याचा प्रयत्न सरकारने केला असून राज्यातील प्राध्यापकांच्या ५,०१२ पदांच्या भरतीला मंजुरी दिली आहे. त्यामुळे महाविद्यालयांना काही अंशी दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

राज्याभरातील विद्यापीठांशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची २० हजारांवर पदे रिक्त आहेत. केवळ नागपूर विभागातच प्राध्यापकांची २,५०० च्यावर पदे रिक्त आहेत. कोरोना महामारीपासून प्राध्यापकांची पदभरती रखडली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसह महाविद्यालयांच्या शैक्षणिक कामांवरही परिणाम होत आहेत. त्यासाठी विविध संघटनांकडून आणि विद्यापीठांकडूनही प्राध्यापक भरतीची मागणी केली जात आहे. राज्य सरकारने राज्यभरातील आता अनुदानित महाविद्यालयांसाठी प्राध्यापकांच्या ५,०१२ पदांच्या भरतीसाठी मंगळवारी मंजुरी दिली. यात नागपूर विभागातील ४२५ पदांचाही समावेश आहे.उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार प्राध्यापक पद भरतीची मंजुरी मिळाली आहे. आता महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे रोस्टर तयार करून पोर्टलवर टाकण्यात येईल व त्यानंतरच भरतीची जाहीरात काढली जाईल.

# आनंदवार्ता : शिक्षण, जीडीपी आणि तेल संकटावर मात करणारा भारत

आजचा भारत अनेक आव्हानांवर मात करत विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचत आहे. शिक्षण क्षेत्रातील सुधारणा, अर्थव्यवस्थेतील (जीडीपी) मजबुती आणि जागतिक तेल संकटाचा प्रभावी सामना—या तिन्ही बाबींमध्ये भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

१. शिक्षण क्षेत्रातील क्रांतिकारी बदल भारताने शिक्षण क्षेत्रात व्यापक आणि दीर्घकालीन सुधारणा सुरू केल्या आहेत. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (ठएढ 2020) हे याचे प्रमुख उदाहरण आहे. कौशल्याधारित शिक्षणावर भरः केवळ पाठांतरावर आधारित शिक्षणाऐवजी विद्यार्थ्यांना कौशल्ये, सर्जनशीलता आणि विचारशक्ती विकसित करण्यावर भर दिला जात आहे. डिजिटल शिक्षणाचा विस्तारः ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म, व्हर्च्युअल क्लासरूम, आणि डिजिटल साधनांमुळे ग्रामीण व शहरी भागातील अंतर कमी होत आहे. संशोधन व नवोपक्रमाला चालनाः उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनासाठी अधिक निधी आणि संधी उपलब्ध होत आहेत, ज्यामुळे जागतिक स्तरावर भारतीय विद्यार्थ्यांची ओळख निर्माण होत आहे. समावेशक शिक्षणः सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी विशेष योजना राबवल्या जात आहेत. या बदलांमुळे भारताची युवा पिढी अधिक सक्षम, आत्मविश्वासी आणि जागतिक स्पर्धेत पुढे जात आहे.

२. भारताची अर्थव्यवस्था (जीडीपी) - स्थिर आणि मजबूत वाढ भारताची जीडीपी वाढ ही जगभरात लक्षवेधी ठरत आहे. सातत्यपूर्ण आर्थिक वाढः भारत सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या

डॉ. राजकुमार कोल्हे
संस्थापक मुख्य संपादक
सा. महाविद्यालय खबरबात

प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. विविध क्षेत्रांचा समतोल विकासः कृषीः उत्पादनवाढ आणि तंत्रज्ञानाचा वापर उद्योगः 'Make in India' उपक्रमामुळे उत्पादनक्षमता वाढ सेवा क्षेत्रः आयटी, बँकिंग, पर्यटन यांचा मोठा वाटा परकीय गुंतवणुकीत वाढ (FDI): जागतिक गुंतवणूकदार भारताकडे आकर्षित होत आहेत, ज्यामुळे रोजगारनिर्मिती वाढत आहे. स्टार्टअप संस्कृतीचा उदयः भारत जगातील मोठ्या स्टार्टअप हब्सपैकी एक बनत आहे. यामुळे भारताची अर्थव्यवस्था केवळ वाढत नाही, तर ती अधिक लवचिक (resilient) आणि स्थिर बनत आहे.

३. जागतिक तेल संकटावर भारताची यशस्वी रणनीती जागतिक स्तरावर तेलाच्या किंमतीत चढ-उतार होत असतानाही भारताने शहाणपणाने त्याचा सामना केला आहे. विविध देशांकडून तेल आयातः एका देशावर अवलंबून न राहता भारताने अनेक देशांशी तेल करार केले आहेत. नूतनीकरणीय ऊजेर्चा वापरः सौर ऊर्जा (Solar), पवन ऊर्जा (Wind) यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. ऊर्जा बचत व कार्यक्षमतेवर भरः छएऊ इलेक्ट्रिक वाहन (EV), आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान यामुळे तेलावर अवलंबित्व कमी होत आहे. रणनीतिक साठा (Strategic Reserves): भविष्यातील संकटासाठी तेल साठवणूक व्यवस्थाही मजबूत करण्यात आली आहे. यामुळे जागतिक संकटांचा भारतावर होणारा परिणाम कमी झाला आहे.

४. आत्मनिर्भर भारत - उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल वरील सर्व घटक एकत्रितपणे भारताला 'आत्मनिर्भर भारत'बनवण्यास मदत करत आहेत. देशांतर्गत उत्पादन वाढत आहे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत तंत्रज्ञान आणि नवोपक्रमात भारत पुढे जात आहे 'विकसित भारत 2047' हे स्वप्न आता वास्तवात उतरवण्याच्या दिशेने देश वाटचाल करत आहे. शिक्षणातील आमूलाग्र बदल, मजबूत आणि वाढती अर्थव्यवस्था (जीडीपी), आणि जागतिक तेल संकटावर प्रभावी नियंत्रण—या सर्व गोष्टी भारताच्या प्रगतीचे स्पष्ट चित्र दाखवतात. आजचा भारत केवळ संकटांचा सामना करत नाही, तर त्या संकटांना संधीमध्ये रूपांतरित करत आहे. यामुळेच भारताचा उद्याचा दिवस अधिक उज्ज्वल, सक्षम आणि समृद्ध असेल.

# पुढील वर्षी चार इयत्तांना नवीन अभ्यासक्रम, नवीन पाठ्यपुस्तके. पण सहावीच्या अभ्यासक्रमाबाबत प्रश्नचिन्ह. कारण काय?



पुणे - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या शालेय स्तरावरील अंमलबजावणी वेळापत्रकानुसार राज्यात येत्या शैक्षणिक वर्षात चार इयत्तांचा अभ्यासक्रम बदलून नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके मिळणे अपेक्षित आहे.

त्यानुसार दुसरी, तिसरी, चौथी या तीन इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची छपाई सुरू करण्यात येणार असून, सहावीच्या अभ्यासक्रमाची अंतिम मान्यता बाकी आहे. त्यामुळे सहावीला नवा अभ्यासक्रम, नवी पाठ्यपुस्तके लागू होण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने राज्यातील शाळांसाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर आणि शालेय शिक्षण २०२४ तयार करण्यात आला. या आराखड्याच्या आधारे अभ्यासक्रम तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले.

तसेच नवा अभ्यासक्रम लागू करण्याबाबतचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्यानुसार २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिली, २०२६-२७ मध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी, २०२७-२८ मध्ये पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी, तर २०२८-२९ मध्ये इयत्ता आठवी, दहावी आणि बारावी या इयत्तांना नव्या अभ्यासक्रमानुसार नवी पाठ्यपुस्तके लागू करण्याचे स्पष्ट करण्यात आले.

यंदाही पॅटच्या प्रश्नपत्रिका अपुऱ्याच परीक्षा कशी घ्यायची? मुख्याध्यापक व शिक्षकांसमोर प्रश्न; एससीईआरटीच्या आदेशानंतरही या पार्श्वभूमीवर, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिलीसाठीची नवी पाठ्यपुस्तके लागू करण्यात आली. आता पुढील वर्षी, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांची नव्या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके लागू करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार दुसरी, तिसरी, चौथी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. मात्र, सहावीच्या अभ्यासक्रमाची प्रक्रिया काही प्रमाणात बाकी आहे. आता नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास केवळ दोनच महिने बाकी असल्याने ही प्रक्रिया कधी पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नव्या पाठ्यपुस्तकांच्या तयारीबाबत शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह म्हणाले, 'राज्यात गेल्यावर्षी इयत्ता पहिलीसाठी नव्या अभ्यासक्रमानुसार सीबीएसईच्या धर्तीवर पाठ्यपुस्तके तयार करून लागू करण्यात आली. आता पुढील शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी, सहावी या इयत्तांसाठी नवा अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे. त्यानुसार दुसरी, तिसरी, चौथीच्या नवीन पाठ्यपुस्तकांचे काम अंतिम टप्प्यात आहे. तर सहावीच्या अभ्यासक्रमाची अंतिम प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. एका वेळी चार इयत्तांचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके पहिल्यांदाच करण्यात येत आहे.

पाठ्यपुस्तकांचे सामाजिक लेखापरीक्षण...

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार दुसरी, तिसरी आणि चौथीच्या नव्या अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली आहे. या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची छपाई करण्यात येणार आहे. सहावीच्या पाठ्यपुस्तकांचेही काम सुरू आहे. यंदा पहिल्यांदाच बालभारतीने पाठ्यपुस्तकांची वैधानिक तपासणी, गुणवत्ता परीक्षण म्हणजेच सामाजिक लेखापरीक्षण करून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच दिव्यांगांसाठीच्या सूचना, सांकेतिक भाषा बोधचिन्हांचा समावेश पाठ्यपुस्तकात करण्यात येत आहे. या माध्यमातून पाठ्यपुस्तकांचे वैश्विकीकरण करण्याचा प्रयत्न आहे, असे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) संचालक अनुराधा ओक यांनी सांगितले.

राज्यातील शाळांच्या पडपडताळणीमध्ये महत्त्वपूर्ण बदल शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

सहावीपासून व्यावसायिक शिक्षण

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार इयत्ता सहावीला व्यावसायिक शिक्षण लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच गणित आणि विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकांसाठी सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांचा आधार घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याशिवाय भाषा, कला, इतिहास, भूगोल असे विषय असणार आहेत.

# अरे बापरे! इतकी उष्णता अचानक का वाढली? एप्रिलच्या 'या' तारखेपासून सुटणार घामाच्या धारा; कारण वाचून थक्क व्हाल!



मुंबई: कधी अवकाळी पाऊस तर कधी अंगातून घामाच्या धारा... सध्या महाराष्ट्रातील हवामानाचा लपंडाव सुरू आहे. एप्रिलच्या सुरुवातीला गारपीट आणि पावसाने झोडपल्यानंतर, आता तिसऱ्या आठवड्यात मात्र राज्याला भीषण उष्णतेचा सामना करावा लागणार आहे. वाढत्या तापमानामुळे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पारा ४० ते ४२ अंशांच्या पुढे जाण्याची भीती हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भात पाऊस, तर उर्वरित महाराष्ट्रात उन्हाचे चटके! एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात विदर्भात वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी असेल. मात्र, इतर भागात सूर्य आग ओकणार आहे. १५ एप्रिलनंतर तापमानात झपाट्याने वाढ होणार असून उन्हाची तीव्रता अधिक जाणवेल. हवामान विभागाने नागरिकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत विनाकारण घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. उष्णता अचानक का वाढणार? ही आहेत महत्त्वाची कारणे वातावरणात एकाच वेळी अनेक बदल घडत आहेत, ज्यामुळे हवामान अस्थिर झाले आहे. दमट हवा: अरबी समुद्रातून येणाऱ्या उष्ण आणि दमट हवेमुळे आर्द्रता वाढली आहे. सायक्लोनिक सक्युर्लेशनः दक्षिण भारतात तयार झालेल्या चक्रीय वाऱ्यांच्या स्थितीचा परिणाम महाराष्ट्रावर होत आहे. पाऊस आणि उष्णतेचे दुहेरी संकट! यावर्षी केवळ उन्हाळाच नाही, तर 'प्रि-मान्सून' पावसाचाही फटका बसण्याची शक्यता आहे. दुपारी कडक ऊन आणि घामाच्या धारा, तर संध्याकाळी पावसाची हजेरी असे विचित्र हवामान पाहायला मिळू शकते. विशेष म्हणजे, यंदा मान्सून उशिरा येण्याची आणि सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता असल्याने चिंता अधिक वाढली आहे. IMD चा इशारा मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात उष्णतेची लाट नसली, तरी तापमान ४० अंशांच्या वर गेल्याने आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. मान्सूनबाबत अधिकृत अंदाज लवकरच प्रसिद्ध केला जाईल.

# खासगी मेडिकल प्रवेशप्रक्रिया आता सरकारी कॉलेजांमध्ये? कायद्यात सुधारणा; नंतर अंमलबजावणी



मुंबई : खासगी वैद्यकीयमहाविद्यालये प्रवेशावेळी विद्यार्थ्यांची अडवणूक करून मनमानी पद्धतीने अतिरिक्त शुल्क वसुली करतात. मात्र, यापुढे त्यांच्या मनमानीला लगाम घातला जाण्याची शक्यता आहे. कारण खासगी वैद्यकीयमहाविद्यालयांतील प्रवेश प्रक्रियेवेळी विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात करण्याचे विचाराधीन आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) त्याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाला पाठविला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी खासगी कॉलेजमध्ये चकरा मारण्याची गरज राहणार नाही.

खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस आणि पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशा वेळी प्रवेशद्वारावरच विद्यार्थ्यांना रोखणे, शैक्षणिक शुल्कात सवलत लागू असतानाही पूर्ण फी भरण्याची सक्ती करणे, शुल्क नियामक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्काची मागणी करणे, प्रवेशासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची मुदत संपेपर्यंत कॉलेजमध्येच विनाकारण थांबवून ठेवणे, अशा अनेक तक्रारी दरवर्षी केल्या जातात. विद्यार्थी आणि पालकांचे मोबाइलही काढून घेतल्याच्या तक्रारी यापूर्वी करण्यात आल्या आहेत.

परिणामी, विद्यार्थी मेरिटमध्ये येऊनही प्रवेश नाकारला जाऊन त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न अधुरे राहते.द्य लोकमत'ने कॉलेजांच्या या मनमानी कारभाराला वेळोवेळी वाचा फोडली होती, तसेच प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याचा मुद्दा लावून धरला होता. या पार्श्वभूमीवर आता सीईटी सेलने प्रवेश प्रक्रियेवेळी खासगी कॉलेजांच्या मनमानीला रोखण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.


कायद्यात सुधारणा; नंतर अंमलबजावणी

या प्रस्तावासंदर्भात सीईटी सेल, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय आणि वैद्यकीय शिक्षण विभागाची बैठक झाली. सीईटी सेलचा प्रस्ताव विचाराधीन आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली. हा प्रस्ताव लागू करण्यासाठी २०१५ मधील कायद्यात सुधारणा करावी लागेल. त्या अनुषंगाने प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.

अडवणूक होऊ नये म्हणून...

यापूर्वी सीईटी सेलच्या केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेतून कॉलेज मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांना दिलेल्या मुदतीत कॉलेजमध्ये जाऊनच प्रवेश घेणे बंधनकारक आहे. त्याऐवजी आता विद्यार्थ्यांना सीईटी सेलने दिलेल्या सरकारी कॉलेजमध्ये कागदपत्रांच्या पडताळणीसाठी जावे लागेल. विविध प्रशासकीय विभागांतील सरकारी मेडिकल कॉलेजांमध्ये हे केंद्र उभारले जाईल. त्याच कॉलेजमध्ये खासगी कॉलेजचे प्रतिनिधी येतील. तेथे विद्यार्थी कागदपत्रे आणि निर्धारित शुल्क जमा करील. विद्यार्थ्यांना अडचण आल्यास वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रतिनिधी अथवा सीईटी सेलचे प्रतिनिधी त्याला मदत करतील, असे या प्रस्तावाचे स्वरूप आहे.

# विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जपण्यासाठी परीक्षा आणि निकाल प्रक्रिया आता 'मिशन मोड'वर!



मुंबई: राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना देश-विदेशातील उच्च शिक्षणाच्या संधी वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन ठोस उपाययोजना करत आहे.. विशेषतः लोणेरे (जि. रायगड) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांच्या (DBATU) परीक्षा आणि निकाल प्रक्रियेतील अडचणी दूर करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ठोस पावले उचलली आहेत. बाटु विद्यापीठाकडून परीक्षांचे वेळापत्रक आणि गुणपत्रिका तसेच पदवी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी विद्यार्थी,संस्थाचालक आणि लोकप्रतिनिधींकडून मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्या आहेत. तसेच या सर्व कोलमडलेल्या वेळापत्रकामुळे अनेक महाविद्यालये व संस्थाचालकांनी विद्यापीठापासून विसंलग्निकरणाचीही मागणी केली आहे. या सर्व शैक्षणिक बाबींची विचार करून प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करण्याचे निर्देश देऊन परीक्षा आणि निकाल प्रक्रिया आता 'मिशन मोड'वर मार्गी लावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

## चेन्नईतील राष्ट्रीय स्पर्धेत अश्विनी जांबळे व प्रिशा पिल्ला यांना कांस्यपदक



चेन्नई, तामिळनाडू : महिला किकबॉक्सिंग नॅशनल लीग - अस्मिता खेलो इंडिया किकबॉक्सिंग २०२६ ही प्रतिष्ठित स्पर्धा तामिळनाडूतील चेन्नई येथे विनायका मिशन युनिव्हर्सिटीमध्ये नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संतोष अग्रवाल सर यांच्या देखरेखीखाली आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातील नामांकित खेळाडूंनी सहभाग नोंदवत आपली उत्कृष्ट क्रीडा गुणवत्ता सादर केली.

या स्पर्धेत पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व करत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. अश्विनी जांबळे आणि प्रिशा पिल्ला यांनी ह्यापॉइंट फाइट' प्रकारात उत्कृष्ट खेळ करत कांस्यपदके पटकावून महाराष्ट्राचा गौरव वाढविला. तसेच कशिश जैस्वार हिने ह्यम्युझिकल फॉर्म' प्रकारात सहभाग नोंदवत संघाच्या कामगिरीत मोलाची भूमिका बजावली.

या संपूर्ण संघाचे नेतृत्व विघ्नेश मुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विशेष म्हणजे, त्यांनी या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत ह्यरिंग रेफरी' म्हणूनही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सामन्यांदरम्यान खेळाडूंना राहुल साळुंखे यांनी तांत्रिक प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले.

राष्ट्रीय स्तरावरील भव्य व्यासपीठावर आपली कौशल्ये सादर करण्याची आणि देशातील सर्वोत्तम खेळाडूंसमोर स्पर्धा करण्याची संधी मिळाल्याबद्दल, सहभागी खेळाडूंनी उमेश मुरकर यांच्याप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या पाठबळामुळे आणि प्रोत्साहनामुळेच ही सुवर्णसंधी मिळाल्याची भावना खेळाडूंनी व्यक्त केली.

या यशामुळे महाराष्ट्राच्या महिला किकबॉक्सिंग क्षेत्राला नवचैतन्य मिळाले असून, भविष्यातही राज्यातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मुंबई विद्यापीठ राजकारण करत असल्याचा आरोप; हे विद्यापीठ टीकेच्या केंद्रस्थानी का आलंय?



मुंबई (प्रतिनिधी) -भारतातल्या जुन्या आणि पहिल्या तीन विद्यापीठांपैकी एक असलेलं जवळपास १६९ वर्षांचा शैक्षणिक वारसा असलेलं मुंबई विद्यापीठ सध्या टीकेच्या केंद्रस्थानी आहे. मुंबई विद्यापीठातील माजी संशोधक विद्यार्थी राजेश बळखंडे उर्फ भदंत विमांसा गेल्या दोनशेहून अधिक दिवसांपासून आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. परंतु त्यांना भेटण्यासाठी आलेल्या तुषार गांधी यांना मुंबई विद्यापीठाने काही दिवसांपूर्वी विद्यापीठ संकुलात प्रवेश नाकारला. तुषार गांधी हे सामाजिक कार्यकर्ते आणि महात्मा गांधी यांचे पणतू आहेत.यापूर्वी चित्रपट निर्माते-दिग्दर्शक आनंद पटवर्धन यांनाही विद्यापीठाने संकुलात प्रवेश करण्यापासून रोखलं होतं. काही दिवसांपूर्वी हे आंदोलन सुरू झाल्यानंतर 'सुरक्षेचं कारण देत,' मुंबई विद्यापीठाने थेट विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी सुरू असलेल्या 'बेस्ट'ची बस सेवाही बंद केल्याची टीका ज्येष्ठ सिनेट सदस्य प्रदीप सावंत यांनी केली आहे. साधारण महिन्याभरापूर्वी ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शहा यांनी म्हटलं होतं की, मुंबई विद्यापीठात एका कार्यक्रमासाठी निमंत्रित केलं आणि नंतर ऐनवेळी येऊ नका असा निरोप देण्यात आला. दरम्यान, मुंबई विद्यापीठाने यावर स्पष्टीकरण देत असं काही झालं नसल्याचं म्हटलं होतं. विद्यापीठाच्या उर्दू विभागानं नसीरुद्दीन शहा यांच्याशी कार्यक्रमातील त्यांच्या सहभागाबाबत किंवा कार्यक्रम रद्द करण्याबाबत काहीही संपर्क केला नसल्याचं विद्यापीठानं निवेदनाद्वारे म्हटलं होतं. परंतु या आणि अशा अनेक घडामोडीनंतर मुंबई विद्यापीठातलं वैचारिक स्वातंत्र्य आणि 'प्रवेशबंदी' याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## भाविकांसाठी महत्त्वाचं! श्री क्षेत्र भीमाशंकरचे दर्शन लांबणीवर, मंदिर पुन्हा 'इतके' महिने बंद.....



पुणे भीमाशंकर ( प्रतिनिधी ) - बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात दर्शनासाठी जाण्याचा प्लॅन करत असाल तर तुमच्यासाठी एक मोठी अन् महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भीमाशंकर मंदिर आणखी 53 दिवस बंद राहणार आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबतची माहिती दिली आहे. मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे आणि भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

भीमाशंकर मंदिर बंद!

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बारा ज्योतिर्लिंग पैकी एक असलेले भीमाशंकर मंदिरात सुरू असलेल्या सभामंडप व परिसर विकास कामांमुळे, तसेच कुंभमेळा पार्श्वभूमीवर वाढणारी गर्दी आणि सुरक्षिततेचा विचार करून ९ एप्रिल ते ३१ मे २०२६ दरम्यान मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यापूर्वीही मंदिर तीन महिन्यांपासून बंद होते, आणि आता पुन्हा पावणे दोन महिने बंद राहणार असून पावसाळ्यापूर्वी मंदिर खुले करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

दर बारा वर्षांनी होणारा कुंभमेळा नाशिक येथे भरणार आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथेही नियोजन सुरु झाले आहे. कुंभमेळ्याच्या काळात भीमाशंकर येथेही भाविक गर्दी करत असतात. या गर्दीचे नियोजन आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे काम सध्या सुरु आहे.

भीमाशंकर येथे नवीन सभामंडप उभारण्याचे काम सुरु आहे. त्याचबरोबर पायरी मार्ग, मंदिरातील विविध विकासकामे वेगाने सुरु आहे. या सर्व कामांमुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री ठेवण्यात आली आहे. त्यामुळेच भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

## नोबेल पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांना 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार 2026' जाहीर...



मुंबई ( प्रतिनिधी ) - नोबेल शांतता पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांना प्रतिष्ठित 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी केली. हा पुरस्कार मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४व्या स्मृतिदिनानिमित्त प्रदान केला जाणार आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान आणि हृदयेश आर्ट्स यांच्या वतीने, सकाळ मीडिया समूहाच्या सहकार्याने आयोजित हा सोहळा देशातील एक अत्यंत मानाचा सांस्कृतिक उपक्रम मानला जातो. कला, साहित्य आणि समाजकार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याची ही परंपरा आहे. 'भावगंधर्व'स्वरूपातील या कार्यक्रमातून मंगेशकर कुटुंबाचा समृद्ध वारसा अधोरेखित होतो. लता मंगेशकर, आशा भोसले यांच्यापासून ते आजच्या पिढीतील कलाकारांपर्यंत भारतीय संगीताचा हा तेजस्वी प्रवास या सोहळ्यातून साकार होतो. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये संगीतासाठी महेश काळे, नृत्यासाठी शमा भाटे, नाटक व चित्रपटासाठी सुबोध भावे, चित्रपटासाठी रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी, पत्रकारितेसाठी सुशील कुलकर्णी, साहित्यासाठी अच्युत गोडबोले, विशेष पुरस्कारासाठी डॉ. धनंजय केळकर, समाजकार्यासाठी ठाणे येथील वसुंधरा संजीवनी मंडळाचे आनंद भागवत यांचा समावेश आहे. तसेच 'मोहन वाघ पुरस्कार - उत्कृष्ट नाट्य निर्मिती' हा सन्मान जिगीषा अष्टविनायक निर्मित 'भूमिका' या नाटकासाठी दिला जाणार असून, या नाटकात सचिन खेडेकर यांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. निर्माते दिलीप जाधव आणि श्रीपाद पद्माकर यांनाही गौरविण्यात येणार आहे. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' (५वे वर्ष) कैलाश सत्यार्थी यांना प्रदान करण्यात येणार आहे. बालहक्क आणि सामाजिक न्यायासाठी त्यांनी केलेल्या जागतिक पातळीवरील कार्याचा गौरव म्हणून हा सन्मान दिला जात आहे. लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' हा राष्ट्रीय सन्मानाचे प्रतीक मानला जातो आणि समाजावर दीर्घकालीन प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींचा गौरव करतो. पुण्यातील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विज्ञान, अध्यात्म आणि मूल्याधिष्ठित शिक्षण यांचा संगम घडवण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनासाठी ते ओळखले जातात. कार्यक्रमात 'मी लता दीनानाथ' हा विशेष संगीत कार्यक्रम सादर होणार असून, पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या संकल्पनेतून लता मंगेशकर यांच्या अमर गीतांना आदरांजली वाहिली जाणार आहे. या कार्यक्रमात विभावरी जोशी, मधुरा दातार, सावनी रवींद्र, श्रेयसी पावगी, मनीषा निश्चल, ऋतुजा तारे आणि डॉ. उन्मेष करमरकर हे कलाकार सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी करणार असून, सुप्रिया चित्राव उद्घोषिका म्हणून कार्यभार सांभाळतील. हा सोहळा शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.०० ते रात्री १०.०० या वेळेत, गणेश कला क्रीडा मंदिर, स्वारगेट, पुणे येथे संपन्न होणार आहे.

## डिजिटल रुपया काय आहे? यूपीआय आणि क्रिप्टोकरन्सीपेक्षा तो वेगळा कसा?



मुंबई - रोख रकमेच्या वापराला ऑनलाईन व्यवहारांचा पर्याय समोर आला आणि आता त्यानंतर डिजिटल रुपयाच्या संदर्भातही चर्चा होत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचा (आरबीआय) डिजिटल रुपया काय आहे? तो यूपीआय आणि क्रिप्टोपेक्षा वेगळा कसा आहे? याच्या पायलट योजनेत (प्रायोगिक स्वरुपात) कोणत्या बँकांचा समावेश आहे, यात कशाप्रकारे सहभागी होता येईल? गेल्या काही काळापासून डिजिटल रुपयाच्या संदर्भात हे प्रश्न इंटरनेटवर विचारले जात आहेत. हा डिजिटल रुपया भारतात कॅशची जागा घेईल का? हा प्रश्नदेखील याबाबतीत विचारला जातो आहे. या सर्व प्रश्नांची उत्तर सविस्तरपणे जाणून घेण्याचा प्रयत्न करूया....... डिजिटल पेमेंट प्रणालीचा विस्तार करण्यासाठी आणि ग्राहकांसाठी पैशांची देवाण-घेवाण सोपी करण्याच्या उद्देशानं, भारतीय रिझर्व्ह बँकेनं (आरबीआय) ऑफलाइन डिजिटल रुपया आणला आहे. रिझर्व्ह बँकेनुसार, डिजिटल रुपया ही भारताची सेंट्रल बँक डिजिटल करन्सी म्हणजे सीबीडीसी आहे. डिजिटल रुपयासंदर्भातील महत्त्वाच्या बाबींविषयी जाणून घेऊया. डिजिटल रुपया काय आहे? डिजिटल रुपया किंवा हे भारतीय चलनाचं म्हणजे रुपयाचं (रु.)डिजिटल स्वरुप आहे. रिझर्व्ह बँकेकडून (आरबीआय) ते डिजिटल स्वरुपात जारी केलं जातं. डिजिटल रुपया रोख रकमेप्रमाणेच काम करतो. त्याचं मूल्य तेच म्हणजे समान असतं. त्याला रिझर्व्ह बँकेची हमी असते.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिंटिंग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : RNI No.: MHMAR/26/A2042

Printed,Published And Owned By.**Dr.Rajkumar M.kolhe** Printed At Jagruti Printg Press,b-101,byculla Service Industrial Estate,D.K.Cross Road, Byculla,Mumbai-400027,andPublished From 501,Gopi Cine Mall Residence,NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.**- 421202**
**Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe,Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042**